ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issues– I
Jan –Feb 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक या संस्थेचे शैक्षणिक योगदान: एक अभ्यास

*श्री संजय काळोगे आणि ** प्रा. डॉ. कैलास खोंडे

*पी एच डी संशोधक
**पी एच डी मार्गदर्शक

**शोध सारांश:**

महाराष्ट्रातील एक अग्रगण्य संस्था म्हणजे मराठा विद्या प्रसारक समाज संस्था होय मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेची स्थापना सन १९१४ मध्ये झाली. आज शतक महोत्सव साजरे केलेली ही शैक्षणिक संस्था शिस्त, गुणवत्ता व पारदर्शकता या त्रिसूत्रीवर मार्गक्रमण करीत आहे. मराठा विद्या प्रसारक समाज संस्था राबवित असलेल्या शैक्षणिक योगदानाचा आलेख पाहता तो आलेख नेहमीच उंचावत असलेला दिसतो. या शैक्षणिक उपक्रमातून संस्थेने आपला एक ठसा उमटवला आहे. आज मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेत विद्यार्थी विविध क्षेत्रात यशस्वीपणे कार्य करीत आहेत. प्रगतीची शिखरे पादाक्रांत करीत आहेत. याचे सर्व श्रेय मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या शैक्षणिक योगदानस जाते .फक्त अध्ययन- अध्यापनातुन पुस्तकी ज्ञान देणे म्हणजे शिक्षण नव्हे तर अध्ययन-अध्यापन बरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी संस्था शैक्षणिक क्षेत्रात विविध उपक्रमांच्या माध्यमातून योगदान देते आहे. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या शैक्षणिक योगदानाचा फक्त विद्यार्थ्यांनाच नव्हे तर समाजाला, इतर शैक्षणिक संस्थांना, राज्य व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरविताना फलदायी व प्रेरणादायी ठरेल असा संशोधकास विश्वास आहे.

***पारिभाषिक शब्दावली-*** मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

## प्रस्तावना

नाशिक जिल्ह्यातील बहुजनांच्या विकासाला चालना देण्यासाठी प्रामुख्याने शैक्षणिक विकास साधून बहुजनांचा उद्धार करून सामाजिक विषमता दूर करण्याच्या उद्देशाने व समाजाला अज्ञानातून बाहेर काढण्यासाठी शिक्षणाची गरज आहे हे ओळखून महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांचे कार्यातून प्रेरणा घेऊन कर्मवीर रावसाहेब थोरात,कर्मवीर गणपत दादा मोरे, कर्मवीर डी आर भोसले ,कर्मवीर कीर्तिवानराव निंबाळकर या समाज धुरिणांनी १९१४ मध्ये मराठा वस्तीगृह सुरू करून मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेची मुहूर्तमेढ रोवली.

बहुजन हिताय बहुजन सुखाय हे ब्रीदवाक्य घेऊन १०७ वर्षापासून मराठा विद्या प्रसारक समाज संस्था शिक्षण क्षेत्रात भरीव कार्य करीत असताना विविध शैक्षणिक उपक्रमाद्वारे शैक्षणिक क्षेत्रात योगदान देते आहे.सन १९१४ मध्ये स्थापन झालेली मराठा विद्या प्रसारक

समाज संस्था ही शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे कार्य करते आहे.४८५ शाखा मधून दोन लाखांचे वर विद्यार्थी आज ज्ञानार्जन करीत आहे.मराठा विद्या प्रसारक समाज संस्था प्राथमिक शिक्षणापासून तर उच्च शिक्षण, व्यावसायिक शिक्षण देते आहे मात्र मराठा विद्या प्रसारक समाज संस्था फक्त अध्ययन-अध्यापनाचे काम करते असे नाही तर अध्ययन-अध्यापना बरोबरच विविध शैक्षणिक उपक्रमातून शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान देते आहे,उंच भरारी घेते आहे.आणि हेच या संस्थेच्या यशा मागील महत्त्वाचे कारण आहे. आज मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे शेकडो विद्यार्थी मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या शैक्षणिक उपक्रमा मुळे यशस्वी झाले आहेत.प्रगतीची उंच भरारी घेत आहेत.  म्हणून मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे शैक्षणिक उपक्रमांना एक अनन्यसाधारण महत्त्व आहे.

महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्यात बहुजनांच्या विकासासाठी बहुजन हिताय बहुजन सुखाय हे ब्रीदवाक्य घेऊन शैक्षणिक प्रचार व प्रसार करणारी एक अग्रणी शैक्षणिक संस्था होय.

**शैक्षणिक योगदान**

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेने शिक्षणाच्या प्रचार व प्रसाराचे कामात सक्रिय होऊन शिक्षणाच्या जागृतीसाठी पूर्व प्राथमिक ते उच्च तंत्रशिक्षण पर्यंत त्यांच्या विविध क्षेत्रातील केलेली कामगिरी यामुळे जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण वाढण्यास मोलाची मदत झाली. संस्थेचे सुमारे ४८५ शाखांमधून चाललेले शिक्षण प्रसाराचे मौलिक कार्य म्हणजे शैक्षणिक योगदान होय. ज्यातून पुस्तकी ज्ञानाबरोबर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास केला जातो.

**संशोधन व्याप्ती व मर्यादा**

**व्याप्ती:-**

१) प्रस्तुत संशोधन हे नाशिक जिल्ह्यातील मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेचे संबंधी आहे

२) प्रस्तुत संशोधन हे नाशिक जिल्ह्यातील मसठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदान संबंधित आहे

**मर्यादा:-**

१) प्रस्तुत संशोधन हे केवळ संस्थेत राबविल्या जाणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमातील योगदाना पुरतेच मर्यादित आहे.

२) प्रस्तुत संशोधन हे नाशिक जिल्ह्यातील के.बी. एच. विद्यालय गिरणारे या शाळेपुरतेच मर्यादित आहे

संशोधकाने पथदर्शी अभ्यास करून त्यासाठी नाशिक जिल्ह्यातील नाशिक तालुक्यातील ग्रामीण भागातील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेची के बी एच विद्यालय गिरणारे या शाळेची निवड करून तेथील विद्यार्थ्यांना मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या शैक्षणिक उपक्रमांवर आधारित प्रश्नावली देऊन सदरचे उपक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उत्तरावरून निष्कर्ष काढले आहेत

**(1) स्पर्धा परीक्षा (peak project Exam)**

**स्पर्धा परीक्षा प्रारंभ - १९८७-८८**

**Pick Paigech Exam -2020-2१**

**उद्देश:-**

1) विद्यार्थी गुणवत्तेचा विकास करणे.

2) विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांना सामोरे जाण्यासाठी सक्षम बनविणे.

**कार्यवाही** : मराठा विदया प्रसारक समाज संस्थेतर्फे संस्थेतील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावर स्पर्धा परीक्षेचे आयोजन केले जाते. इयत्ता ३री व ४थी चे विदयार्थ्यासाठी चित्रकला स्पर्धा, इयत्ता ५वी ते १० वी विद्यार्थ्यांसाठी M.V.P.T.S ही विज्ञान-गणित व इंग्रजी विषयावर परीक्षा घेतली जाते. ११वी व १२वी व अध्यापक विद्यालय स्तरावर सामान्य ज्ञान परीक्षा घेतली जाते. शैक्षणिक वर्ष २००६-२००७ पासून प्रज्ञाशोध परीक्षा सुरु केली आहे. परीक्षेचे स्वरूप व अभ्यासक्रम हा पाठ्यपुस्तकांवर आधारित असतो. सदरचे परीक्षेसाठी शिक्षक शालेय वेळेव्यतिरिक्त वेळेत रोज जादा तास घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. सदरचे परीक्षेचे मूल्यमापन वस्तुनिष्ठतेने केले जाते.

मराठा विदया प्रसारक समाज संस्थेने १९८७-८८ मध्ये सुरु केलेल्या स्पर्धा परीक्षेत बदल करून सन २०२०-२१ पासून पीक प्रोजेक्ट परीक्षा म्हणून ओळखले जाऊ लागली आहे. इयत्ता ५वि ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा घेतले जाते. पूर्वीचे स्पर्धा परीक्षेतील लेखी परीक्षेचे स्वरूप बदलून पीक प्रोजेक्ट परीक्षा ही इतर स्पर्धा परीक्षा प्रमाणे वस्तुनिष्ठ प्रश्नाचे स्वरूपात OMR Sheet वर उत्तरे नोंद करून घेतली जाते. विद्यार्थ्यांची तयारी करून घेण्यासाठी शिक्षकांना प्रत्येक महिण्यात दुसऱ्या व चौथ्या शनिवारी तज्ज्ञांकडून प्रशिक्षण दिले जाते. शिक्षक रोज शालेय वेळेव्यतिरिक्त आदा तासिकांना व सुट्टीचे दिवशी तासिका घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात, जिल्ह्यातून किमान ५०००० विद्यार्थी परीक्षेत सहभागी होतात. या उपक्रमातून विद्यार्थ्यांचे विषयज्ञान व सामान्यज्ञानात वृद्धी होऊन पुढील स्पर्धा परीक्षेसाठी विदयार्थी तयार होती आहे, हे मोठे यश आहे.

**(2) मविप्र पद्धती (MVP Pattrn)**

**प्रारंभ.** १९९३

**उदेश:-** 1) विदयार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे.

2) शाळेचा पर्यायाने संस्थेचा निकाल उंचावणे

**कार्यवाही** :-

मराठा विदया प्रसारक समाज संस्थेच्या सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील १२वी विज्ञान शाखेच्या विदयार्थ्यांसाठी व जून २०१४ पासून ११वीं विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मवित्र पैटर्न राबविण्यात येतो. वर्षभराचे अभ्यासक्रमाचे नियोजन करून शिकविल्या जाणाच्या

या अभ्यासक्रमावर सराव परीक्षा घेतल्या जातात. विद्यार्थी पालक मेळावा घेऊन पालकांशी संवाद साधला आलो. विदयार्थ्यांच्या चूका विदयार्थी व पालकांच्या निदर्शनास आणून दिल्या जातात. शिक्षकांचे अध्यापन परिणामकारक होण्यासाठी तज्ञांचे मार्गदर्शनाचे आयोजन केले जाते, चर्चासत्र घेतली जातात. एस. एस. सी बोर्डाच्या परीक्षा प्रमाणे २ सराव परीक्षा व CET च्या तीन सराव परीक्षा संपूर्ण अभ्यासक्रमावर घेण्यात येतात. वर्षभर रोज व उन्हाळी-दिवाळी सुट्टीचे कालावधीत जादा तासिका घेऊन विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते.

**(3) मविप्र युवास्पंदन:-**

**प्रारंभ:- सन २०१३-१४**

**उद्देश** :- विदयार्थी कलागुणांना वाव देणे.

**कार्यवाही** :- मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेन २०१३-१४ पासून संस्थेच्या ज्युनिअर व सिनिअर महाविद्यालयीन आयटीआय अध्यापक विद्यालये विद्यार्थ्यांना स्वतःचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे, म्हणून मविप्र युवास्पंदन हा युवकांसाठी कार्यक्रम सुरु केला. संगीत नृत्य, नाट्य, गीतगायन या विभागातील १० कला प्रकारामध्ये ही स्पर्धा प्राथमिक व अंतिम फेरीत पार पडते. प्राथमिक फेरी तालुका स्तरावर १० केंद्रातून घेतली जाते. अंतीम फेरी नाशिक येथे संस्थेच्या रावसाहेब थोरात सभागृहात जाते. यात सुमारे ९५ महाविद्यालयातील विद्यार्थी उत्सूर्त प्रतिसाद नोंदवतात.

**(4) मविप्र मरेथॉन स्पर्धा** :-

**प्रारंभ :-** संस्थास्तर १९९५-९६, राज्यस्तर २००९, राष्ट्रीय स्तर २०१४

**उददेश:-** १) विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधने

2) राष्ट्रीय स्तरावर खेळाडू तयार करणे.

**ब्रीद वाक्ये :-** Run For Health & Build the Nation

**कार्यवाही :** शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी व २१ व्या शतकात शारीरिक तंदुरुस्तीला प्राप्त झालेले महत्त्व लक्षात घेऊन तत्कालीन संस्थेचे सरचिटणीस कर्मवीर वसंतराव पवार यांचे प्रेरणेने मविप्र मेरेथॉन स्पर्धेस प्रारंभ झाला.मविप्र मॅरेथॉन स्पर्धा विविध गटात घेतली जाते. १० वर्षाच्या विद्यार्थ्यापासून ते ७० वर्षाच्या पुरुषापर्यंत स्पर्धक स्पर्धेत सहभाग घेतात. नाशिक क्रिडा इतिहासातील सर्वोच्च अंतर धावण्याची ही स्पर्धा आहे. मुलींच्या ४ गटातून व मुलांच्या ४ गटातून व मुलच्या ४ गटातून प्रत्येकी १ ते ६ क्रमांक प्राप्त खेळाडुंची बक्षिसासाठी निवड होते. पुरुष खुल्या गटातून ४२.१९५ कि.मी. गटासाठी १ते११ कुमांक प्राप्त खेळाडूला बक्षिसे दिले जातात. मविप्र राष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेत ८०००००/- रु ची रोख बक्षीसे, आकर्षक ट्रॉफी. व भारतीय सांस्कृतिक, धार्मिक महत्त्व असलेल्या चंदन, औदुंबर, लिंब, तुळस, बेल या वृक्षाच्या पानांचा मुकुट बहाल केला जातो.

**वैशिष्टे:-**

१) वय वर्ष ४५ किंवा त्यापेक्षा जास्त वयाचे पुरुष व ४० वर्ष वा त्यापेक्षा जास्त महिलांसाठी खुला गट

2) वय वर्ष ६० किंवा त्यापेक्षा जास्त वयाचे पुरुषांसाठी खुलागट

३) वय वर्ष ७५ किंवा त्यापेक्षा जास्त वयाचे पुरुषांसाठी खुला गट

४) वय वर्ष ८० वर्षावरील जेष्ठ नागरीकांचा (पुरुष) खुला गट

स्पर्धेसाठी नियोजन व व्यवस्थापन अत्यंत उत्कृष्ट असते. पोलिस बंदोबस्त संस्थेतील हजारावर शिक्षक स्वयंसेवक म्हणून कामकाज पाहतात. बाहेरून येणाऱ्या ४ ते५ हजार खेळाडुंना स्पर्धेचे एक दिवस अगोदर रात्री व स्पर्धेचे दिवशी जेवण, चहा दुधाची व्यवस्था केली जाते. दुखापतग्रस्त खेळाडूना उपचार करण्यासाठी 20 बेडचे हॉस्पिटल, खेळाडुंना इलेक्ट्रो पावडर, दुध, ज्युस, लेमन ज्युस फळे तसेच तज्ञ वैद्यकिय पथक असते. स्पर्धेतून अनेक स्पर्धक राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडू तयार झाले आहेत. मोनिका आथेर त्याचीच उदाहरणे आहेत. स्पर्धेचे अतिथी म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडू लाभले आहेत.

**(५) लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र :**

**प्रारंभ:-** ८० व्या शतकात

**उद्देश :- १)** मविप्र समाज संस्थेच्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे.

२) स्पर्धापरीक्षांमध्ये मराठीचा टक्का वाढविणे.

**कार्यवाही:-** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत, महाविद्यालयास स्पर्धा परीक्षा M.P.S.C, UPSC परीक्षेचे मार्गदर्शन केले जाते. महाविद्यालयाचे विषयतज्ञ प्राध्यापक, प्राचार्य, राज्य व राष्ट्रीय विद्यापिठांतील तज्ञ प्राध्यापक त्यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले जाते.

20 ऑगस्ट २०१९ रोजी के.टी. एच.एम महाविद्यालय व पीची फिप्सन निकेतन संस्था यांचे संयुक्त विद्यमाने मराठा विद्याप्रसारक समाजाचे के. टी. एच. एम महाविद्यालय व पिची फिप्सन निकेतन संचलित स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र नाशिकरोड या नावाने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु केले आहे.

**सदरचे मार्गदर्शन केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना पुढील सुविधा पुरवल्या जातात.**

१) ६० विद्यार्थी क्षमतेचे सुसज्ज असा क्लास रूम दररोज 3 तास वर्ग चालतात.

२) स्वतंत्र अभ्यासिका व त्यासाठी आवश्यक पुस्तके उपलब्ध.

३) मुलांसाठी २४ तास तर मुलींसाठी १2 तास अभ्यासिका खुली.

४) प्रत्येक आठवड्याला मोफत सराव पेपर.

५) मराठी इंग्रजी विज्ञान, गणित, बुद्धिमत्ता, चालू घडामोडी या विषयांकडे विशेष लक्ष.

६) प्रत्येक विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष व शासकिय नोकरभरतीचे परीक्षा फॉर्म विनामूल्य भरून दिले जातात.

७) नाशिक मध्ये प्रथमच स्पर्धा परीक्षा क्षेत्रामध्ये निवासी बॅचेस.

८) विद्यार्थ्यांना क्लास, अभ्यासिका, निवास व भोजन या सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध.

**(६) Diligent Batch (विशेष प्राविण्यवर्ग)**

**प्रारंभ** - २०१६

**उद्देश :-** 1) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करणे.

2) विदयार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या युगात सक्षम करणे.

**कार्यवाही:-**

इयत्ता १2 वी विज्ञान नंतर वैद्यकिय अभियांत्रीकी इ. शाखांच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या -MHT/ CET/JEE / NEET या परीक्षांच्या पूर्वतयारीसाठी ११वी विज्ञान शाखेचे विशेष प्राविण्य वर्ग Diligent Bateh मराठा विदया प्रसारक समाज संस्थेने सुरु केले. या वर्गात रोज ८ ते ९ तास अध्यापन मार्गदर्शन केले जाते. तज्ञ मार्गदर्शकाचे Gest Lucter सह Space Tutorial कंपनीचे सॉफ्टवेअर दिले जाते. तसेच १०० विद्यार्थी एकाच वेळी बसतील असा भव्य Computer tab ची तयारी केली, असून डिजिटल बॅच च्या विदयार्थ्यांच्या MCQ.d.theory परीक्षांचे एकत्रीतपणे स्पष्टीकरण देण्यासाठी भोजन व अभ्यासासाठी उपयोग केला जातो. परीक्षांचा अधिकाधिक सराव व्हावा म्हणून या बॅचचे विद्यार्थ्यांना कुठलीही सुट्टी दिली जात नाही.

**म.वि.प्र. सांस्कृतिक महोत्सव:-**

**प्रारंभ:-** सन २००८

**उद्देश:-** १) विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणे.

2) पारंपारिक लोककला व संगीताचा वारसा जोपासणे.

**कार्यवाही :-** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेने

"बहुजन हिताय बहुजन सुखाय' हा उदात्त हेतू डोळयासमोर ठेउन शिक्षण प्रसाराचा वारसा घेउन तळागळातून बहुजन समाजाला शिक्षणाचे प्रवाहात आणले आहे. तसेच संस्था विद्यार्थ्यांची भावी पिढी साक्षर व सुशिक्षित करण्या बरोबरच सुसंस्कृत व व्हावी यासाठी सतत प्रयत्नशील असेल. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे तत्कालीन सरचिटणीस स्वर्गीय डॉ. वसंतराव पवार यांच्या संकल्पनेतून मविप्रच्या विद्यार्थ्यांच्या गुणांचा विकास व्हावा म्हणून सांस्कृतिक महोत्सव सुरु करण्यात आला. भारतीय पारंपारिक लोककला अभिजात संगीताचा वारसा जपण्यासाठी या महोत्सवात समूह गीत, एकपात्री नाट्य, वैयक्तीक गीत-गायन, वैयक्तिक व समूह नृत्य

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issues– I
Jan –Feb 2022

OPEN ACCESS

Original Research Article

अशा विविध स्पर्धा घेण्यात येतात.

स्पर्धा सर्वप्रथम तालुका स्तरावर संपन्न होतात व त्यातील प्रत्येक स्पर्धेचे प्रथम ३ क्रमांकाचे विजयी संघ जिल्हास्तरावर सहभागी होतात. यशस्वी स्पर्धकांना संस्थेतर्फे बक्षिसे देऊन सन्मानित केले जाते. त्याच बरोबर त्यांचे कलागुणांचा विकास व्हावा म्हणून त्यांना मार्गदर्शन व साहय्य केले जाते.

**वाचन संस्कृती उपक्रम :**

**प्रारंभ :-** २०१४

**उद्देश :-** १) विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करणे.

2) विद्यार्थ्यांचे ज्ञान अद्ययावत करणे.

३) विदयार्थ्यांच्या मुल्यांमध्ये वाढ करणे.

४) विद्यार्थ्यांना साहित्य व साहित्यकांची ओळख करून देणे.

**कार्यवाही :**व्यक्तीची वैचारिक, सामाजिक समृद्धीसाठी वाचन संस्कृती महत्त्वाची आहे. व्यक्ती कोणत्या प्रकारचे वाचन करते, समाज जीवनात कशी वागते. ही बाब महत्त्वाची ठरते. वाचनातून सभोवतालच्या व जगातील घडामोडी समजतात. त्यातून जिज्ञासा पूर्तीचा आनंद मिळतो. निर्मळ आनंद मिळविण्यासाठी वाचन संस्कृती महत्त्वाची असते. वाचनातून लिहीण्याची सवय आपोआप लागते. आज व्यक्ती पुस्तकां पासून, वाचना पासून दूर जातो आहे. आणि म्हणून वाचन संस्कृती वाढावी यासाठी मराठा विद्या प्रसारक वाचन संस्कृती उपक्रम सुरु केला. या उपक्रमात शाळा, महाविद्यालयांना निवडक पुस्तकांची यादी देउन पुस्तके ग्रंथालयात घ्यावी. वाचन मंडळ स्थापावे, गटवार चर्चा करावी, नैतीक मूल्यांची जोपासना होणारी पुस्तके विद्यार्थ्यांनी वाचावी. वाचलेल्या पुस्तकाचे मूल्यमापन करण्यास प्रवृत्त करावे आवडलेल्या पुस्तकांचा परिचय, रसग्रहण, वृत्तपत्रातून करणे ही अपेक्षा.

शिक्षकांनी आपल्या विषया व्यतिरिक्त इतर विषयाची पुस्तके वाचून स्वताचे ग्रंथालय करावे, संदर्भ पुस्तके वाचावीत, वाचनाचे संस्कार विद्यार्थ्यांवर रुजवावे, विद्यार्थी व पालकांना वाचव्यासाठी प्रवृत्त करावे, ही अपेक्षा पालकांनी घरात ग्रंथालय तयार करावे, ही अपेक्षा. या संबंधी पालकांना जाणीव व्हावी, समाजाचा वाचनाबाबत संपर्क वाढावा. वाचन संस्कृती अधिक वाढावी यासाठी संस्थेच्या प्रत्येक शाखेत ग्रंथालय सप्ताह घेण्यात येउन गावागावातून ग्रंथदिंडी काढण्यात येते. मविप्र संस्थेला तसेच संस्थेच्या विविध शाखांना भेटी देणाऱ्या मान्यवरांना भेट म्हणून पुस्तक दिले जाते.

**क्रीडा पुरस्कार**

**1) सर्वोत्कृट कबड्डी खेळाडू पुरस्कार**

**प्रारंभ:-** २०१५-१६

**उद्देश :-**१) विद्यार्थी क्रिडा कौशल्याचा विकास साधने पारंपारिक खेळाचे जतन करणे.

२) विद्यार्थ्यांना राज्य व राष्ट्रीय स्पर्धेसाठी सक्षम बनविणे.

३) विद्यार्थ्यांच्या शारिरीक क्षमतेत वाढ करणे.

४) पारंपारिक खेळाचे जतन करणे.

**स्वरुप :-** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेने जेष्ठ सभासद व माजी.खासदार ॲड. उत्तमराव धिकले यांचे सन्मानार्थ सर्वोत्कृत खेळाडू साठी ५०००/-रु पारितोषिक सम्मानपत्र दिले जाते.

**२) सर्वोत्कृट क्रिडा पत्रकार पुरस्कार**

**प्रारंभ:-** २०१७

**उद्देश :-** १) क्रिडा क्षेत्रातील पत्रकारांना प्रोत्साहीत करणे.

२) लोकशाहीचा आधारस्तंभ प्रसार माध्यमांना सक्षम करने

**स्वरुप :** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेदवारे सन २०१७ पासून सर्वोत्कृत क्रिडा पत्रकार पुरस्कार नाशिक मधील विविध वृत्त संस्थांमधील क्रिडा पत्रकारास दरवर्षी राष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळयास प्रदान केला जातो

**३) मविप्र सर्वोत्कृष्ट खेळाडू पुरस्कार** -

**प्रारंभ** - २०१४

**उद्देश :-** १) विद्यार्थ्यामध्ये क्रिडा प्रविण्य निर्माण करणे.

२) विद्यार्थ्यांना राज्य व राष्ट्रीय स्पर्धेसाठी सक्षम बनविणे.

३) विद्यार्थ्यांच्या सूप्त कलागुणांना वाव देणे.

४) विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधने.

**स्वरूप :-** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेतील सर्वोच्च क्रिडा प्राविण्य प्राप्त करणाऱ्या माध्यमिक, ज्युनिअर व सिनिअर विभागात शिक्षण घेणाऱ्या 3 विद्यार्थी व 3 विद्यार्थीनींना मविप्र मॅरेथॉन पारितोषिक वितरण समारंभात सन्मानित करण्यात येते. रुपये ११०००/- समृतिचिन्ह व प्रमाणपत्र दिले जाते.

**निष्कर्ष**

१) मविप्र संस्थेच्या शैक्षणिक योगदानातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते

२) मविप्र संस्थेच्या शैक्षणिक योगदानातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत लक्षणीय वाढ होते

३) मविप्र संस्थेच्या शैक्षणिक योगदानामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो

४) मविप्र संस्थेच्या शैक्षणिक योगदानामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढलेला दिसून येतो.

५) मविप्र संस्थेच्या शैक्षणिक योगदानातून विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षेची भीती नाहीशी होऊन मराठी टक्का वाढण्यास मदत होते

६) मविप्र संस्थेच्या शैक्षणिक योगदानामुळे विविध स्पर्धा परीक्षेत विद्यार्थी यशस्वी होतात

७) मविप्र संस्थेच्या शैक्षणिक योगदानातून महाराष्ट्राच्या रूढी परंपरा रुजविणे व जतन करणेस मदत होते

८) मविप्र संस्थेच्या शैक्षणिक योगदानातून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची जोपासना झालेली दिसून येते.

९) मविप्र संस्थेच्या शैक्षणिक योगदानातून विद्यार्थी शिक्षक व पालकांचे वाचन संस्कृतीत वाढ होते

१०) मविप्र संस्थेच्या शैक्षणिक योगदानातून विद्यार्थ्यांच्या शारीरिक कलागुणांचा विकास होतो

११) मविप्र संस्थेच्या शैक्षणिक योगदानातून विद्यार्थ्यांना राज्य व राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत संधी प्राप्त होऊन यश प्राप्त होते

१२) मविप्र संस्थेच्या शैक्षणिक योगदानातून विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा प्राविण्य विकसित होते

१३) मविप्र संस्थेच्या शैक्षणिक उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमतेचा विकास होतो

१४) मविप्र संस्थेच्या शैक्षणिक उपक्रमातून पारंपारिक लोककलेची विद्यार्थ्यांना ओळख होऊन पारंपारिक लोककलेचे संवर्धन होण्यास मदत होते.

१५) मविप्र संस्थेच्या शैक्षणिक योगदानामुळे शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणासाठी व समाजातील बहुजन घटकाला शिक्षण प्रवाहात आणण्यास मदत झाली आहे.

**समारोप :**

मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक या संस्थेतर्फे विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी गुणवत्ता, शिस्त आणि पारदर्शकता या त्रिसूत्रीला अनुसरून शिक्षणाबरोबरच शारीरिक मानसिक, भावनिक, सामाजिक व सांस्कृतिक अशा विविध पैलूंना विकसित करण्यासाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबविले जातात.

**संदर्भ-ग्रन्थ सूची**

**मराठी पुस्तके**

अमृतकुंभ, अमृत महोत्सव (सन १९१४-१९८९) मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक

कुंडले, म.ब.(१९९६) शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र श्री.विद्या प्रशाकन पुणे

भिंतोड, वि.रा.शैक्षणिक संशोधन पद्धती पुणे नित्यनुतन प्रकाशन

बोऱ्हाडे शंकर, शोध डॉ.वसंतराव पवारांचा (२०११) सारांश प्रक्षण नाशिक

खैरनार, वसंत. (२०२१) वसंत चैतन्ययात्री डॉ.वसंत पवार ज्योती प्रकाशन, नाशिक

**नियतकालके:-**

१०५ वा वार्षिक अहवाल, मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक. सन २०१८-१९

१०६ वा वार्षिक अहवाल, मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक. सन २०१९-२०

१०७ व वार्षिक अहवाल, मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक. सन २०२०-२१

समाजपत्रिका डिसेंबर २०१५ सरचिटणीस, मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक.

समाज पत्रिका सरचिटणीस मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक. जानेवारी-मार्च २०१८.

सन २०१९-२०, ५७वा वार्षिक अहवाल नाशिक जिल्हा मविप्र समाज सेवक सहकारी सोसायटी लि.नाशिक.

**वृत्तपत्रे**

टारगेट एज्युकेशन तर्फे पिक प्रोजेक्ट शिक्षक प्रशिक्षण -दै.पुढारी. १/७/२०१९

राष्ट्रीय क्रीडा दैनानिमित्ती मविप्र तर्फे रक्तदान शिबीर- गावकरी. १९/८/२०१९

विद्यार्थ्यांना मिळाली वाचन प्रेरणा – आपले महानगर. १६/१०/२०१९

मॅरेथॉन विजेता बने सुशील कुमार- हमारा महानगर. ६/१/२०२०

सदृढ समाजासाठी पत्रकाराची गरज गावकरी. ७/१/२०२०

सैन्य दलातील सुशील कुमार मविप्र मॅरेथॉन विजेता देशदूत/ पुढारी. ६/१/२०२०

पुण्याचे गरवारे कॉलेज ठरले मविप्र करंडक वकृत्व स्पर्धेचे मानकरी- दिव्य मराठी. १९/१/२०२०

विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती कार्यशाळादेशदूत. ३०/१२/२१

**इंग्रजी पुस्तके:-**

Buch M.B (1983-1988) Vol-2 forth survey of research in education.

Best John W.khan, James S.V (2009) Research in Education, 10th Education.

John, Best J.M khan research in education, prentice Hall of India New Delhi Darling Kindersley.

NCERT (1993-2000) Vol.16th survey of Education research

**वेबसाईट**

www.mvp.edu.in

www.inflibent.in

*Cite This Article:*

***श्री. संजय काळोगे आणि प्रा. डॉ. कैलास खोंडे*,(2022).** *मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक या संस्थेचे शैक्षणिक योगदान: एक अभ्यास. Aarhat Multidisciplinary International Education Research Journal, XI (I),242-251.*